MHNG180009132020 **किरकोळ फौजदारी अर्ज क्र. १३५/२०२०**
**रागीनी वि. शिवशंकर**

**निशाणी क्र. ५ वरील आदेश**
**(उद्घोषणा दिनांक १६ नोव्हेंबर, २०२२)**

**१.** कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ (कौ.हिं.म.सं.अ.२००५) मधील कलम २३ नुसार अर्जदार यांनी सदर अर्ज सादर केला असून त्याद्वारे मुळ अर्जावर न्यायनिर्णय होईपर्यंत संरक्षण आदेश व आर्थिक मदतीचे आदेश करण्याबाबत विनंती करण्यात आलेली आहे.

**२.** अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांचे लग्न दिनांक ०३.०५. २००९ रोजी नगर परीषद शाळा क्र. ७, काटोल, ता. काटोल, जि. नागपूर येथे रितीरिवाजाप्रमाणे झाले. अर्जदार व गैरअर्जदार यांना ओम नावाचा मुलगा व चैतन्य नावाची मुलगी अनुक्रमे डिसेंबर २००९ व सन २०१५ मध्ये दोन अपत्ये झालेली आहेत.

**३.** लग्नानंतर अर्जदार ही गैरअर्जदाराकडे बुधवार पेठ, काटोल, ता. काटोल येथे राहण्यास गेली. त्यानंतर गैरअर्जदाराने अर्जदाराला फक्त सहा महिने चांगली वागणुक दिली त्यानंतर शारीरिक व मानसिक इजा दिल्या, खोटया कारणावरून वाद घातले. त्यानंतर गैरअर्जदाराने अर्जदाराला टि.व्ही पाहण्याकरीता प्रतिबंद केले व तिच्या माहेरून टि.व्ही. आणण्याकरीता म्हटले. अर्जदाराला वाईट शब्दांमध्ये बोलु लागले. गैरअर्जदाराकडे गॅस असुनही ते अर्जदाराला मातीच्या चुलीवर स्वयंपाक करायला लावत असे. अशा प्रकारे गैरअर्जदार यांनी अर्जदारांचा छळ केला असे अर्जदार यांचे कथन आहे. त्यांनी प्रस्तुतच्या अर्जाद्वारे मुळ अर्जाचा निकाल लागेपर्यंत गैरअर्जदाराला अर्जदाराकडे येण्यापासुन परावृत्त करणे,

अर्जदारासोबत बोलण्यास प्रतिबंध करणे, गैरअर्जदाराला अर्जदाराच्या नातेवाईक व इतर व्यक्तींपासुन दुर राहण्याकरीता आदेशित करणे, अर्जदाराला व तिच्या मुलांना राहण्याकरीता एक वेगळी खोली देणे किंवा अर्जदाराला किरायाच्या घरामध्ये राहण्याकरीता रक्कम रू. ३,०००/- प्रति माह, भरणपोषण भत्ता रू. ३,०००/-, औषधोपचार खर्च रू. २,०००/-, कपडयावरील खर्चाकरीता रू. १,०००/- आणि मेटेंनन्स खर्च रू. १०,०००/- प्रति महिना गैरअर्जदार यांचेकडुन मिळावा अश्या मागण्या केलेल्या आहेत.

४. गैरअर्जदार यांनी त्यांचे म्हणणे नि.क्र. १३ वर दाखल केलेले असुन त्यामध्ये त्यांनी त्यांच्याविरूध्दची अर्जदाराची सर्व कथने नाकारलेली आहे. त्यांच्या कथनानुसार अर्जदार ही स्वेच्छेने त्यांच्यापासुन वेगळया राहत आहेत. प्रस्तुतचे प्रकरण अर्जदार यांनी गैरअर्जदार यांच्याकडुन पैसे उकळयासाठी केलेले असुन अर्जदार व गैरअर्जदार हे सोबतच एका घरात राहतात व एकच अन्न खातात, त्यांच्यातील संबंध चांगले आहेत व त्यांच्यात कुठलाही वाद नाही. अर्जदार यांना मुलांना सहा महीने एकटे सोडुन त्यांचे वडीलांचे घरी जावुन राहण्याची सवय आहे. त्या संशयी असुन संशयावरून गैरअर्जदार यांना त्रास देतात, आत्महत्या करण्याची व खोटया केसमध्ये गुंतविण्याची धमकी देतात. त्यांनी आत्महत्या करण्याचा प्रयत्न देखील केला आहे. सुरूवातीपासुनच त्या मुलांची काळजी घेत नसल्यामुळे मुलांनाही त्यांच्याबद्दल प्रेम व आपुलकी नाही. अर्जदार व गैरअर्जदार हे प्रताप मनीराम साहु यांच्या न्यु कैलास नगर, मानेवाडा, दादाजी धुनीवाले मठाजवळ राहत असताना अर्जदार यांनी प्रताप यांचेसोबत अनैतिक संबंध प्रस्थापीत केली. अर्जदार यांचा मुलगा ओम याने प्रताप यांच्यासोबत अनैतिक संबंध प्रस्थापीत करताना पाहीले असता अर्जदार यांनी त्याच्या डोक्यात मारले होते. अर्जदार या अत्यंत बेजबाबदार व निष्काळजी असुन त्या पत्नी व आईची जबाबदारी पार पाडत नाही. मुलाच्या अभ्यासाकडे लक्ष देत नाही. त्यांचे

अनैतिक संबंधामुळे गैरअर्जदार व मुलांचे मानसिक आरोग्य धोक्यात आलेले आहे. अर्जदार यांनी लग्नानंतरच्या दोन महीन्यांनंतरच गैरअर्जदार यांना त्रास देणे सुरू केले होते. अर्जदार हे त्यांचे आई वडिलांचे घरी राहत असताना त्यांना परत घेवुन येण्यासाठी गैरअर्जदार गेले असता त्यांनी त्यांच्यासोबत जाण्यास नकार दिला. त्यांच्या वडिलांनी मी माझ्या मुलीला सांभाळेल व गैरअर्जदार यांच्या घरी जावु देणार नाही. अर्जदार हया मुलांना सुध्दा भेटायला आल्या नाही. त्या सचिव म्हणुन काम करतात व रू. १०,०००/- प्रतिमाह कमवितात. गैरअर्जदार यांनी अर्ज खर्चासह नामंजुर होण्यास पात्र आहे असे म्हटले आहे.

**५.** अर्जदार यांच्यातर्फे सुविज्ञ वकील श्री काळे व गैरअर्जदार यांच्यातर्फे सुविज्ञ वकील श्री एन.डी.अंजनकर यांचे युक्तीवाद ऐकले. माझ्या समक्ष पुढील मुद्दे उपस्थित होतात. त्यांवरील माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे आहेत.

| **अ.क** | **... मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | गैरअर्जदार यांनी अर्जदारांविरूध्द कौटुंबिक हिंसाचार केला आहे किंवा करत आहेत असे अर्जदार प्रथम दर्शणी सिध्द करतात काय? | ... अंशत: होय. |
| २. | अर्जदार या अंतरिम आदेश करून मिळणेस पात्र आहेत काय? | ... अंशत: होय. |
| २-अ. | होय असेल तर कोणत्या प्रकारचे आदेश ? | ... केवळ मासिक उदरनिर्वाह भत्ता. |
| २-ब. | आर्थिक आदेशाच्या बाबतीत प्रमाण काय असावे? | ... रू. १,२००/- प्रति माह आदेशाच्या तारखेपासुन. |

## कारणमिमांसा

६.  अर्जदार व गैरअर्जदार यांची दोन्ही अपत्ये गैरअर्जदार यांचेकडे राहत असल्याचे अविवादीत आहे.

**मुद्दा क. १ बाबत**

७.  कौटुंबिक हिसांचार प्रतिबंधक अधिनियम, २००५ चे कलम ३ नुसार  कौटुंबिक हिसांचाराची व्यापती लक्षात घेता पत्नीला आर्थिक मदत न करणे अथवा तिला खर्चासाठी पैसे न देणे या गोष्टी देखील कौटुंबिक हिसांचार अंतर्गत येतात. याचा विचार करता प्रस्तुतच्या प्रकरणामध्ये दोन्ही पक्षांची कथने लक्षात घेता गैरअर्जदार हे अर्जदार यांना आर्थिक मदत करत नाहीत अथवा त्यांना खर्चासाठी पैसे देत नाहीत या बाबीदेखील कौटुंबिक हिसांचार या सदराखाली येतात. इतर कुठलीही प्रकारचा कौटुंबिक हिसांचार झाल्याबाबत अभिलेखावरून सकृतदर्शनी म्हणता येत नाही. त्यामुळे या मुद्दयास या बाबीपर्यंत मी होकारार्थी निष्कर्ष नोंदवितो.

**मुद्दा क. २ बाबत**

८.  गैरअर्जदार यांना असे शारिरीक अथवा मानसिक अपंगत्व नाही जेणेकरून ते कमावु शकणार नाहीत असे दोन्ही पक्षांच्या कथानांवरून सकृतदर्शनी दिसुन येते. अर्जदार या कमावत्या आहेत याबाबत कुठल्याही प्रकरचा सकृतदर्शनी पुरावा अभिलेखावर नाही. अर्जदार या अंतरिम उदरनिर्वाह भत्ता मिळण्यास अपात्र आहेत असे दर्शविणारी कुठलीही बाब अभिलेखावर नाही. त्यामुळे या मुद्दयास मी होकारार्थी निष्कर्ष नोंदवितो.

**मुद्दा क. २-अ बाबत**

९.  अर्जदार यांचेतर्फे केवळ आर्थिक स्वरूपाचा कौटुंबिक हिंसाचार

झाल्याचे सकृतदर्शनी दिसुन येत आहे. मात्र इतर कुठल्याही प्रकारचा कौटुंबिक हिंसाचार झाल्याचे सकृतदर्शनी आढळुन येत नाही. त्यामुळे अर्जदार यांना मासिक उदरनिर्वाह भत्ता व्यतिरीक्त इतर कुठलाही आदेश अंतरिम स्वरूपात देणे योग्य होणार नाही. या मुद्दयास मी त्याप्रमाणे निष्कर्ष नोंदवितो.

**मुद्दा क. २-ब बाबत**

**१०.** आर्थिक आदेशाचे प्रमाण निश्चित करतेवेळी सर्वात महत्वाची बाब म्हणजे अर्जदार व गैरअर्जदार यांची लहान मुले गैरअर्जदार यांच्यासोबत राहतात ही आहे. अर्जदार यांच्यातर्फे गैरअर्जदार यांचे उत्पन्न सकृतदर्शनी सिध्द करण्यात आलेले नाही. लहान मुलांच्या वाढ व विकासावर गैरअर्जदार यांना जास्तीत जास्त खर्च करता येणे हे न्यायोचित आहे. प्रकरणाचे स्वरूप व दोन्ही पक्षांची कथने लक्षात घेता, अर्जदार यांच्या राहण्याचे ठिकाण लक्षात घ ेता त्यांना रू. १,२००/- प्रतिमाह एवढा उदरनिर्वाह भत्ता देणे योग्य राहील असे माझे मत आहे. अर्जातील गैरअर्जदार यांच्या म्हणण्यातील कथने लक्षात घ ेता पुराव्यानंतर अर्ज दाखल तारखेपासुन उदरनिर्वाह भत्ता देता येवु शकतो मात्र अर्जदार व गैरअर्जदार यांच्या मुलांच्या भवितव्यासाठी, नियमित लसीकरणासाठी, शैक्षणिक खर्चासाठी आवश्यक असलेली रक्कम लक्षात घेता अर्ज दाखल तारखेपासुन या प्रकरणामध्ये अंतरिम उदरनिर्वाह भत्त्याचा आदेश करणे न्यायोचित होणार नाही. त्यामुळे अर्जदार यांना प्रतिमाह रू. १,२००/- एवढा उदरनिर्वाह भत्ता आदेशाच्या तारखेपासुन गैरअर्जदार यांनी देण्यासाठी त्यांना आदेशित करणे योग्य राहील असे माझे मत आहे. या कारणांस्तव मी पुढील आदेश पारीत करतो.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज खर्चासह अंशत: मंजुर करण्यात येतो.

२. कौ.हिं.म.सं.अ.,२००५ चे कलम २३ अन्वये गैरअर्जदार यांना आदेशित करण्यात येते की, त्यांनी आदेशाच्या तारखेपासुन अर्जदार यांना प्रतिमाह रू.१,२००/- ही रक्कम अंतरिम उदरनिर्वाह भत्ता म्हणुन या प्रकरणामध्ये न्यायनिर्णय होईपर्यंत दयावी.

(आदेश खुल्या न्यायालयात श्रृतलेखीत व उद्घोषित करण्यात आला.)

**ठिकाण : कळमेश्वर**
**दिनांक : १६ नोव्हेंबर,२०२२**

**( यो. सु. कवडे )**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग**
**न्यायालय कं. २, कळमेश्वर,**
**जिल्हा नागपूर**

**ENDORSEMENT**

| | | |
|---|---|---|
| Case Argued on | : | 16.11.2022 |
| Judgment dictated on | : | 16.11.2022 |
| Transcription Ready on | : | 16.11.2022 |
| Judgment checked and signed off | : | 16.11.2022 |

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF file Judgment are same word to word, as per the original Judgment.

Name of the Stenographer :-R. S. Daware (Gr. III)